# साठ नव्हे, आता सात दिवसात बांधकाम परवाना

## नांदेड मनपाचा लोकाभिमुख उपक्रम

**नांदेड, दि. 18 :** बांधकाम परवानगीसाठी सर्व कागदपत्रांची ऑनलाईन पूर्तता व छाननीअंती ती परिपूर्ण असल्याची खात्री पटल्यानंतर आता केवळ सात दिवसात बांधकाम परवाना मिळण्याची प्रकिया सुरु झाली आहे. त्यामुळे कायदेशीर बांधकाम करणा-या मालमत्ताधारकांची गैरसोय दूर झाली असून संगणकावर सर्व कागदपत्रे संग्रहित व अद्यावत राहत असल्याने फाईलींचा ढिगारा सांभाळण्याची मनपा प्रशासनाची कसरत आता कायमची संपणार आहे.

घर किंवा इमारतीचे बांधकाम म्हटले की, मालमत्ताधारकांना दररोज नवी कागदपत्रे मागवण्यात येत असल्याने महापालिकेकडे हेलपाटे मारावे लागत होते. परंतु बांधकाम परवाण्याच्या संपूर्ण कागदपत्रांची यादी व पडताळणी करण्याचे काम आता संगणकाच्या सहाय्याने ऑनलाईन शक्य झाल्याने शहरवासीयांची मोठी सोय झाली आहे. पूर्वी घर किंवा बांधकामाच्या परवानगीसाठी एक लेखी अर्ज देवून काही कागदपत्रे जोडली जात होती. त्यात बांधकामाचे नकाशे, घराचे खरेदीखत, टोच नकाशे, मालमत्ता नोदणी प्रमाणपत्र (पी.आर.कार्ड), मंजूर लेआऊट व अन्य कागदपत्रासंबंधात काही त्रुटी आढळल्या की पूर्तता करण्याची नोटीस देवून पूर्तता करण्याचे बंधन मालमत्ताधारकांवर टाकण्यात येत होते.

**बोलले ते करून दाखवले**

बांधकाम परवाना कायद्यातील तरतुदीनुसार 60 दिवसात बांधकाम परवाना देणे अपेक्षित आहे. परंतु एकदा परवानगीचा अर्ज दिला आणि महापालिकेने त्रुटींच्या पूर्ततेअभावी परवानगी दिली नाही तरी कायद्यातील तरतुदीचा विपर्यास करून अनेक लोक आपले बांधकाम सुरु करीत होते. त्यामुळे त्यांना भविष्यात अप्रिय कारवाईला सामोरे जावे लागणे अपरिहार्य होते. 2001 पासून अशा ब-याच फाईली तुंबल्याने ही बाब मनपा सर्वसाधारण सभेतही गाजली होती. त्यावेळी मनपा आयुक्त डॉ. निपुण विनायक यांनी ऑनलाईन अर्जाद्वारे नागरिकांना सात दिवसात बांधकाम परवानगी देण्याचा संकल्प जाहीर केला होता. तो आता पूर्णत्वास उतरला आहे.

**अशी केली पूर्वतयारी**

केंद्र सरकारच्या जेएनएनयुआरएम योजनेअंतर्गत शहर सुधारणा अभियानात मालमत्ताधारकांना त्यांची बांधकाम परवानगी ऑनलाईन कागदपत्रे मागवून देणे बंधनकारक होते. त्याकरिता सुरुवातीच्या काळात नांदेड मनपाने आउटसोर्सिंग करून एका एजन्सीला हे काम दिले. परंतु त्यावेळी केवळ नवीन बांधकाम परवानगीसाठी आलेली कागदपत्रे, नकाशे व अन्य लेआऊट संगणकावर ऑफलाईन पद्धतीने तपासण्याचे काम होऊ लागले. सदर एजन्सीचे सोफ्टवेअर वार्षिक देखभालीसाठी आले असताना मनपाने बांधकाम परवाना देण्याचे सोफ्टवेअर त्यांच्याकडून ठेवून घेतले आणि स्वत: विकसित केले. महापौर अजयसिंह बिसेन

व आयुक्त डॉ. निपुण विनायक यांच्या मार्गदर्शनाखाली उपआयुक्त (महसूल) डॉ. विद्या गायकवाड, नगररचना विभागाचे सहाय्यक संचालक सु. ल. कामठाणे, नगररचनाकार खुशाल कदम आणि नगररचना विभागातील सर्व टीमने गेल्या 10 महिन्यापासून या प्रकल्पावर अविश्रांतपणे काम केले. गेल्या दि. 17 ऑक्टोंबर 2011 पासून मनपाने बांधकाम परवान्याचे लेखी अर्ज स्वीकारणे पूर्णपणे बंद करून त्यापूर्वीची परिपूर्ण कागदपत्रे असलेल्या परवान्याची सर्व फाईली निकाली काढल्या. ज्यांनी पूर्तता केली नव्हती, त्यांच्या फाईली नस्तीबंद करून नव्याने ऑनलाईन अर्ज देण्याच्या सूचना दिल्या.

**अशी आहे ऑनलाईन अर्जाची पद्धत**

नव्या धोरणानुसार बांधकाम परवान्याचे अर्ज परिपूर्ण असण्यासाठी तो आता वास्तुविशारदान्मार्फत ऑनलाईन पद्धतीनेच स्वीकारला जाईल. त्यात मालकी हक्क प्रमाणपत्र (पी.आर. कार्ड), मंजूर लेआऊट, नियमानुसार नकाशे, घर/जमीन खरेदीची मूळ कागदपत्रे, चटई क्षेत्राचा वापर अशी सर्व कागदपत्रे स्कॅन करून इंटरनेटद्वारे ऑनलाईन पद्धतीने दाखल करावे लागतील. तसेच त्याची एक दुय्यम प्रत मनपाच्या आवक विभागात दाखल करून संबधित कागदपत्रांची तपासणी करून घेतली जाते. सदर संचिका परिपूर्ण असेल तरच स्वीकारली जाते आणि त्यास टोकन क्रमांक दिला जातो. संचिकेत दाखल केलेली सीडी व कागदपत्रांची छाननी कनिष्ठ अभियंता यांच्याकडून ऑटो डीसीआर सोफ्टवेअरमार्फत करून स्थळ पाहणी केली जाते. यात काही तांत्रिक दोष आढळले तर नगररचना विभागामार्फत संबधित वास्तुविशारद यांना ऑनलाईन पद्धतीने कळवले जाते. संबधित त्रुटींची पूर्तता केल्यानंतर नगररचना विभागाकडून संगणकीय संचिका (फाईल) मंजुरीसाठी सहाय्यक संचालकाकडे पाठवली जाते. ही सर्व प्रकिया केवळ सात दिवसात करणे आवश्यक असून, त्या पद्धतीने मनपाची वाटचाल सुरु आहे.

**सर्वांना प्रशिक्षण**

नव्या प्रक्रियेची माहिती सर्व वास्तुविशारदांना होऊन त्यांना ही प्रकिया सुलभ व्हावी, याकरिता मनपा यंत्रणेकडून त्यांना अतिरिक्त माहितीचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्याचबरोबर विभागातील लिपिक, कनिष्ठ अभियंते आणि सर्व संबधित अधिका-यांनी या प्रक्रियेची माहिती घेतली. यापुढेही आवश्यकतेनुसार या प्रणालीचे अतिरिक्त प्रशिक्षण देण्याची मनपाची तयारी असल्याचे उपआयुक्त गायकवाड यांनी सांगितले.

**परवानगीची माहिती एका क्लिकवर**

ऑनलाईन प्रकरणे दाखल केल्यानंतर संबधित वास्तुविशारदांना मनपात प्रत्येक टप्प्यावर असलेली स्थिती आणि काढलेल्या त्रुटी याची माहिती 24 तास ऑनलाईन पाहण्यासाठी व त्रुटी दूर करण्यासाठी उपलब्ध असते. त्यमुळे मनपात ना येत अगदी सुट्टीच्या दिवशी किंवा कार्यालयीन वेळ संपल्यानंतरदेखील त्या दूर करता येणे सुलभ झाले आहे. या प्रक्रियेमुळे वेळ आणि त्रासाची मोठी बचत झाली असून बांधकाम परवानगीची सर्व माहिती व अन्य दस्तावेज एका क्लिकवर उपलब्ध झाले आहेत.